DoI : 10.5281/zenodo.6519801

IARA – International Journal of Humanities, Social Science, Business Management and Commerce,
Vol. 2, Issue. 1, Jan 2022; Pages 15 –17
ISSN (Online): 2583-181X

# जुन्या किंवा प्राचीन चिनी राजकीय विचारांचे अध्ययन

प्रा.डॉ. चंद्रशेखर ढोले
राज्यशास्त्र विभागप्रमुख,
शिवजागृता महाविद्यालय, नळेगाव

**प्रस्तावनाः**

हिंदुस्थानप्रमाणेच चीनचीही संस्कृती फार प्राचीन किंवा जुनी आहे. विस्तारित वाळवंटे, उंच उचं पर्वतरांगा आणि भौगोलिक क्षेत्रफळ यामुळे मध्यपूर्वेतील प्राचीन व जुना विचार व कल्पनांचा प्रसार प्रचार चीनमध्ये वेग वाढू शकला नाही. मध्यपूर्वेतील विचार एका बाजूस भारताकडे व दुस–या बाजूस ग्रीसमधे गेले. पीत नदीच्या खो–यात असलेली प्राचीन चिनी संस्कृती मात्र हजारो वर्षे या प्रवाहापासून वेगळी राहिली. मध्यपूर्वेपासून हे अंतर हजारो मैल आहे. त्यात खि. पू. १७०० पासून मधल्या भागात हिंसक टोळ्या त्रास देत होत्या. त्यांची निष्कारण हिंसेवरचा विश्वास आणि कमालीचे सामर्थ्य यामुळे साधा प्रवासही अशक्यप्राय होता. मात्र अशा कठीण अवस्थेतूनही काही विचार व काही साधने चीनमधे गेल्याचे संशोधक मान्य करतात. ६५०० खि. पू. या सुमाराची चीनमधील शेतीची पद्धती पश्चिम आशियातील त्यापूर्वीच्या पद्धतीशी साम्य दर्शवणारी होती. खि. पू. दोन हजार वर्षांपूर्वीच्या भांडयाकुंड्यांवरही मध्यपूर्व व पूर्व युरोपच्या तत्कालीन संस्कृतीचा स्पष्ट प्रभाव दिसतो. असे थोडे अपवाद सोडले तर चिनी संस्कृती बऱ्याच अंशी स्थानिक परिस्थितीतून स्वतंत्रपणे निर्माण झाली. बैलाचा वापर करून ओढावयाचा नांगर मध्यपूर्वेत खि. पू. ३००० मध्ये सुरू झाला तर तशी पद्धत चीनमधे प्रारंभ होण्यास खि. पू. चौथे शतक लागले. तेथे कुदळ फावडयाची(खोरे) शेती चालू होती. अशा अनेक कारणांमुळे जुन्या काळी सुसंस्कृत मध्यपूर्व, पूर्व युरोप आणि भारत यांच्यापेक्षा चिनी संस्कृतीतील मानवाचे दैनंदिन जीवन काही अंशी वेगळे होते. प्राचीन संस्कृतीतील या स्वतंत्र व स्वयंभूषणामुळे आणि इतर देशातील संबंधच न आल्यामुळे चिनी लोकांना परक्यांबद्दल द्वेष आणि मत्सर निर्माण झाले होते.

चीनचा जुना आणि प्राचीन इतिहास निश्चितपणे समजत नाही. इतिहास संशोधकांनी उत्खनन करून काही तर्क मांडले. त्यावरून खि. पू. दोन हजार वर्षांपासून तेथे संस्कृती होती असे सांगता येते. खेडी होती, खेडयांच्या भोवती भिंती होत्या, बागेतील लागवड करावी त्याप्रकारची शेतीही होती. कलाकार, व्यापारी,

*Submission date: 21 Dec 2021 / Acceptance date: 11 Jan 2022 /Available online 11 Jan 2022

व्यावसायिक लोक यांच्या अस्तित्वाबद्दल ठोस पुरावे सापडत नाहीत. त्यावरून अगदी प्राथमिक अवस्थेत हे लोक त्या काळी राहत असावेत.

**चीनमधील प्राचीन राजघराणीः—**

अभ्यासक व इतिहासकारांच्या मते चीनमधील पहिले राजघराणे (Hsia) हे होय. या कालखंडाबाबत फारशी माहिती उपलब्ध नाही. खि. पू. १५२३ ते १०२८ या कालखंडातील शेंग या दोन क्रमांकाच्या राजघराण्याच्या कालखंडातील काही माहिती मात्र उपलब्ध आहे. या राजघराण्याच्या अन्यांग या राजधानीचे बरेच अवशेष उत्खननात सापडले. घोड्यांचा रथ, ब्राँझ शस्त्रे, धनुष्यबाण, चालवणे चौकोनी शहराची रचना इ. पुराव्यावरून या कालखंडात चीनचा इतर देशांशी थोडाफार संबंध आला असावा असे वाटते. कलात्मक कामे करणाऱ्यांची घरेही आढळली. सँग घराण्याचा कालखंड म्हणजे राजा व दरबारातील लोकांचे हौस व मौज आणि हतबल शेतकन्यांनी भरलेली प्रजा यांचा कालखंड होता. याच कालखंडात चीनची बऱ्याच प्रमाणात कला, धर्म, संस्कृ ती या क्षेत्रांत विकास झाला. याच काळात चिनी भाषा आणि लेखनकार्य सुरू झाले.

**महान चीनी विचारवंत कन्फ्यूशियसः—**

शेंग राजघराण्याचा कालखंड चिनी संस्कृतीच्या बाबतीने महत्त्वाचा असला तरी पुढील कालखंडात त्याचा प्रभाव फारसा दिसला नाही. खि. पू. १००० च्या काही वर्ष अगोदर सँग घराण्याला नष्ट करून चाऊ राजघराणे ऐश्वर्यसंपन्न झाले. हे घराणे खि. पू. २५६ पर्यंत कायम होते. चिनी वाङ्‌मयाला चाऊ राजघराण्याच्या कालखंडात प्रारंभ झाला. कला कुसरीच्या बाबतीतही हे राजघराणे पुढील काळी अत्यंत वैभवशाली ठरले. खि. पू. ५०० च्या सुमारास चाऊ राजघराण्याचे राज्य असले तरी खरी सत्ता लहान सहान संस्थानिकांत व स्थानिक सत्ताधिशाकडे होती. याच कालखंडात चीनमधील महान अभ्यासक कन्फ्यू शियस (खि. पू. ५५१ ते ४७८) होऊन गेला.

**दैवी सिद्धांताची मांडणी :—**

चाऊराज घराण्यापासून १६११ पर्यंत जी राजनीती चालू होती त्याचा मुख्य सिद्धान्त ईश्वरी उत्पत्तीचा होता. तिएन (स्वर्ग) मधून राजाला अधिकारपदे व सूत्रे मिळतात. मात्र नियुक्तीप्रमाणे हा अधिकार देवाकडून काढूनही घेतला जातो. नियुक्ती आणि काढून घेणे या बाबी वेगळया पद्धतीने होतात. दैवी सिद्धान्तामधून दोन उपसिद्धान्त निर्माण झाले. देवाचा अधिकार संपूर्ण पृथ्वीवर असल्याने देवाकडून नेमलेला सम्राट सर्व जगाचा मालक होणार. याचा अर्थ असा की चीनच्या राजाचा अधिकार फक्त चीनपुरताच नसून सर्व विश्वावर त्याचे मालकी राहणार आहे. चिनच्या राजकीय विचारात राजाचा उल्लेख ‘ईश्वरपुत्र’ असा होऊ लागला व चिनची जनता असे मानू

लागले की, त्याचा सर्व विश्वावर अधिकार आहे. याचा एक महत्त्वाचा फायदा असा झाला की राज्याची विस्कळीत घडी, फुटीरतेवर अनेक राजे ही राजकीय हानिच होती. पण अशी अवस्था अनैतिक आहे असे लोकांना वाटू लागले होते. या जगामुळे लष्करी ताकद एकता चीनला जुन्या काळी लाभले. राजघराण्यांमागून राजघराण्यांनी मोठी साम्राज्ये कायम टिकवली. राजकीय ऐकतेला ही इश्वरपुत्राची कल्पना फार उपयोगी पडली. शेंग घराण्याची सत्ता. हिसकावून आपले आसन स्थिर करण्यासाठी चाऊ सम्राटांना हा इश्वरपुत्र कल्पनेचा प्रचार व प्रसार फायद्याचा ठरला. कदाचित् त्यांच्यापैकीच कोणीतरी चतुर व्यक्तीने हे प्रचार साधन अंमलात आणतो. ईश्वरत्रांच्या सिद्धान्ताने चीनला जसे महत्वाचे ठरले तसे नुकसानकारक पण ठरले. कारण आमचा राजा विश्वाचा सम्राट ही ठाम भुमिका ठेवल्या मुळे परक्याशी त्यांचे चांगले संबंध निर्माण झाले नाहीत व पुढे इतराशी सामर्थ्या मुळे नतमस्तक व्हावे लागले त्यावेळी फार त्रास झाला.

इश्वरपुत्र सिद्धान्ताचा दुसरा उपसिद्धान्त हा आपोआप अस्तित्वात आला की, राजाला ईश्वराकडून सत्ता मिळाली आणि इश्वराच्या मान्यतेनुसार ते संपणार तेव्हा इश्वराला काय महत्वाचे वाटते, त्याची मर्जी कायम टिकण्यासाठी राजाने काय करावे, कसे कार्य करावे हे निश्चित करण्यात चिनी अभ्यासकांच्या अनेक पिढ्याच्या पिढ्या यात गुंतून गेल्या होत्या. ईश्वराला नैतिक वागणारा आणि स्वच्छ सत्ताधीश आवडतो. राजकाडून चूक झाली तर राष्ट्राला किंमत मोजावी लागणार. पूर, दुष्काळ, साथीचे आजार यामुळे ईश्वराची गैरमर्जी व्यक्त होते आणि अतिगंभीर परिस्थितीत तो राजाला समूळ नष्ट करून दुसऱ्या राजघराण्याची स्थापना करतो.

**संदर्भसूची :–**

1. ना.य.डोळे, राजकीय विचाराचा इतिहास द् कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे
2. सुधाकर कुलकर्णी द् निवडक राजकीय विचारवंत, विद्याभारती प्रकाशन, लातूर
3. भास्कर भोळे द् आधुनिक भारतातील राजकीय विचार, पिंपळापुरे ॲण्ड पब्लिशर्स, नागपूर.